# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

प्रस्तावना :-

विषय :- महानगरपालिका क्षेत्रात **"नगरपरिषद अग्निशमन व आपत्कालीन सेवांचे बळकटीकरण योजना"** विकासासाठी विशेषतरतुद योजनेअंतर्गत निधी वितरीत करणे बाबत.

उपरोक्त विषयांकीत कामी जा.क्र/जिवायो/नगरोत्थान/का-४/२०२४-२५/४७४७ दि.२६/०९/२०२४. रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर पत्रान्वये मनपास **महानगरपालिका क्षेत्रात "नगरपरिषद अग्निशमन व आपत्कालीन सेवांचे बळकटीकरण योजना"** विकासासाठी विशेष तरतुद योजनेअंतर्गत १००% शासन निधी प्राप्त होणार आहे. त्या अनुषंगाने यादी मधील खालील नमुद कामाचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत.

| | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील प्राग समिती क्र ०५ कासारआळी येथील फायर स्टेशन बनविणे.** | **२,९९,८८,१०१/-** |
| | एकुण रक्कम | **२,९९,८८,१०१/-** |

ठराव क्रं. :- ६१७ दिनांक :- १० /१० /२०२४

उपरोक्त नमुद ०१ कामांचे प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी **अजय वैद्य**, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरिल नमुद एकुण ०१ कामांच्या एकत्रीत अंदाजपत्रकीय रक्कम रु. **२,९९,८८,१०१/-** मात्रच्या कामाच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय ठरावाची मंजुरी देत आहे

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय:- प्रभाग समिती क्र.२ अंतर्गत टेमघर नाका ते भादवड रोड पर्यत व टेमघर नाक ते टेमघर रोड अंतर्गत रस्ते दुरुस्ती करणे.**

प्रभाग समिती क्र.२ अंतर्गत टेमघर नाका ते भादवड रोड पर्यत व टेमघर नाक ते टेमघर रोड अंतर्गत रस्ते दुरुस्ती करणे. कामी रक्कम रु.९९,९१,८९९/- मात्र प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक ०१/०१/२०२४ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास ठराव क्रं.५२२ दिनांक ०१/०१/२०२४ अन्वये आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु.९९,९१,८९९/ ई-निविदा सुचना क्र.४३/२०२४-२५ (१०६०५४) दि.१९/०८/२०२४ रोजी दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.१९/०८/२०२४ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा प्राप्त झाल्या असुन त्यापैकी पात्र झालेल्या निविदा खालीलप्रमाणे आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | **मे.साई एस.एस.के इन्फ्रास्ट्रक्चरल** | **अंदाजपत्रकिय दरापेक्षा ९.९९% कमी दराने** |
| २ | मे. झा.पी.ॲण्ड कंपनी | अंदाजपत्रकिय दरापेक्षा ६.६०% कमी दराने |
| ३ | मे.सुर्या इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दरापेक्षा ६.५०% कमी दराने |
| ४ | मे.एआयसी इन्फ्रास्ट्रक्चरल | अंदाजपत्रकिय दरापेक्षा ७.००% कमी दराने |

वरील पैकी **मे.साई एस.एस.के इन्फ्रास्ट्रक्चरल** यांची अंदाजपत्रकिय दररपेक्षा ९.९९% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.८९,९३,७०८/- (रु.एकोणनव्वद लाख त्रेहाण्णव हजार सातशे आठ मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- ६१८ दिनांक :-१०/१० /२०२४

मे.साई एस.एस.के इन्फ्रास्ट्रक्चरल यांची अंदाजपत्रकिय दररपेक्षा ९.९९% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.८९,९३,७०८/- (रु.एकोणनव्वद लाख त्रेहाण्णव हजार सातशे आठ मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ अंतर्गत टेमघर नाका ते भादवड रोड पर्यत व टेमघर नाक ते टेमघर रोड अंतर्गत रस्ते दुरुस्ती करणे.कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.साई एस.एस.के इन्फ्रास्ट्रक्चरल यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.श.महानगरपालिका**

ok

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**
**विद्युत विभाग**

**प्रस्तावना**

**प्रति:- मा.प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**प्रस्तावना**

**विषय :- महानगरपालिकेच्या हद्दीत एम.एम.आर.डी.ए मार्फत रस्ता रुंदीकरण व सिमेंटीकरण करुन पथदिवे व्यवस्था केलेल्या रस्त्यांवरील पथदिवे बदलून Smart LED पथदिवे बसविणे व ५ वर्ष निगा दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.**

महानगरपालिकेने शहरांतील एकूण ५२ रस्ते सिमेंट क्रॉक्रीट एम.एम.आर.डी.ए मार्फत करण्याचे मंजुर केलेले असुन त्यापैकी सन २०१९ पासुन आतापर्यत १५ रस्ते व कल्याणरोड वरिल उड्डाणपुलाची कामे केलेली आहेत. उड्डाणपुल व रस्त्यांत सिमेंट क्रॉक्रीटीकरणासह नव्याने पथदिवे हि व्यवस्था केलेली आहे एकूण १०७२ दिवे पोलसहित बसविण्यात आलेले आहेत. परंतु सदर रस्त्यावरील पथदिव्यांची निगा व दुरुस्ती महानगरपालिकेला करावयाची आहे. १०७२ दिव्यांपैकी अनेक पथदिवे बंद असल्याने अनेक तक्रारींना तोंड द्यावे लागत आहे. महानगरपालिकेने पथदिव्यांच्या राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत (S.L.N.P) पारंपारिक दिवे बदली करुन केंद्रशासनाच्या अंगीकृत कंपनी ईईएसएल मार्फत २३१३५ पथदिवे लावलेले असुन त्यांची निगा व दुरुस्ती हि ७ वर्षापर्यत ईईएसएल कंपनी मार्फत केली जात आहे. एम.एम.आर.डी.ए मार्फत बसविलेल्या पथदिव्यांची निगा व दुरुस्ती एम.एम.आर.डी.ए करित नाही व ईईएसएल प्रस्तावात एम.एम.आर.डी.ए. ने बसविलेल्या पथदिव्यांचा समावेश नाही. श्रीगणेशउत्सव काळात महानगरपालिकेला १०० नविन दिवे खरेदी करुन बदली करावे लागले आहेत. परंतु आणखी दिवे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सध्या सदर पथदिव्यांच्या निगा व दुरुस्तीचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. ईईएसएल कंपनीची देयके अदा करणेची प्रलंबित असल्याने त्यांचे मार्फत नविन कामे केली जात नाहीत. तसेच ईईएसएल करित असलेल्या निगा व दुरुस्तीची कामे हि दुरुस्ती साहित्या अभावी वेळेत होत नाहीत. त्यामुळे हि नागरिकांच्या तक्रारीना वारंवार तोंड द्यावे लागत आहे.

एम.एम.आर.डी.ए मार्फत बसविण्यात आलेले १०७२ दिव्यांना बसवुन ३ ते ४ वर्षाचा कालावधी झालेला आहे. तसेच मनपा निधी तसेच शासन निधीतुन बसविलेले २३५ दिवे तसेच सध्या ईईएसएल मार्फत धामणकर नाका उड्डाणपुल, वंजारपट्टी नाका उड्डाणपुल येथिल दिव्यांचा प्रकाश कमी असल्याने व उड्डाणपुलांवर अपघात होत असल्याने चांगल्या प्रकाशाची आवश्यकता आहे. तसेच शहरांतील चौकामध्ये ईईएसएल मार्फत ५ वर्षापुर्वी बसविण्यात आलेल्या हायमास्टचे फिटींग डॅमेज झालेले असुन ईईएसएल मार्फत फक्त दुरुस्ती केली जाते. बदलण्यात येत नाहीत. त्यामुळे एकूण १७०० नग दिव्यांची वार्षिक निगा व दुरुस्ती करावी लागणार आहेत.

सदर एल.ई.डी दिवे दुरुस्ती कामी SOR (Shedule of Rates) मध्ये दर उपलब्ध् नसल्यामुळे बाजारातील दर मागवून दरपृथ्वकरण केलेले आहे. सदरचे दिवे निगा व दुरुस्ती ५ वर्ष कालावधी करिता अंदाजपत्रक तयार केले असता रुपये १,८८,५५,५९८/- खर्च येणार आहे. सध्या बाजारात Smart LED दिवे उपलब्ध असुन त्यांची क्षमता Lumens/Watt जादा असल्याने कमी वॅटच्या दिव्यांमध्ये हि जास्त प्रकाश पडत असल्याने वीज खर्च कमी होऊन वीजेच्या वापरात व खर्चात बचत होते. SOR (Shedule of Rates २०२३-२४) मध्ये Smart LED दिव्यांचे दर उपलब्ध नसल्याने व SOR मधील सदरच्या दिव्यांच्या दरापेक्षा हि बाजार भावातील दर कमी असल्याने smart LED दिव्यांच्या प्रस्तावात बाजारभावातील दरांचा समावेश केलेला आहे. त्यामुळे मुळ खर्चात हि बचत होत आहे. (SOR दरापेक्षा) त्याबाबतची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

१.अंदाजपत्रकानुसार गेल्या ३-४ वर्षापासुन एमएमआरडीए मार्फत बसविण्यात आलेले LED पथदिवे वार्षिक निगा दुरुस्ती कामी ५ वर्षाचा येणारा खर्च (opex+GST) - एकुण रु. १,८८,५५,५९८/-

वीज बचत - सामान्य्

दरमहा येणारा निगा व दुरुस्ती खर्च - रु. ३,१४,२६०/-

२.निगा व दुरुस्ती ऐवजी LED दिवे बदलून व ५ वर्ष निगा व दुरुस्ती करणेकामी एस.ओ.आर. दरानुसार येणारा खर्च (capex + opex+GST) रु. ३,६७,५१,१४४/-

दरमहा प्रकल्प परतावा (६० Installment) रु. ८,१७,५०९/-

प्रकल्प खर्च व्याजासह(capex + opex) रु. ४,९०,५०,५३४/-

३. निगा व दुरुस्ती ऐवजी Smart LED दिवे जास्त Lumens/Watt प्रकाराचे बदलणे व ५ वर्ष निगा व दुरुस्ती करणे करिता येणारा खर्च (capex + opex+ GST) रु.३,३३,७६,५३८/-

दरमहा प्रकल्प परतावा (६० Installmet) रु. ७,४२,४४३/-

प्रकल्प खर्च व्याजासह(capex + opex+ GST) रु. ४,४५,४६,५५९/-

Smart LED दिव्यांनमुळे अतिरीक्त वीज बचत कि. वॅट - ५२.५६ कि.वॅट

वार्षिक वीज बचत युनिट - २,३०,२०० युनिट

वार्षिक वीज बचत रक्कम रु. १७,५६,४२३/-

५ वर्षात अपेक्षित वीज बचत रु. ८७,८२,११७/-

४. बाजारभावातील दरानुसार capex+ GST खर्च रु. १५३२२५३८/-
प्रकल्प् खर्चाच्या प्रस्ताव नुसार opex+ GST खर्च रु. १८०५४०००/-
Capex खर्च + ५ वर्ष निगा व दुरुस्ती एकूण खर्च रु. ३३३७६५३८/-

Capex खर्चाच्या ७५ % रक्कम
(Upfront अदा करणे करिता ) रु. ११४९१९०४/-

उर्वरित २५% Capex परतावा (६० Installmet) रु. ८५,२१०/-
व Opex परतावा (६० Installmet) रु. ३,००,९००/-
एकूण प्रति माह हप्ता रु. ३,८६,११०/-
प्रकल्प खर्च व्याजासह(capex + opex+ GST) रु.३,४६,५८,५२५/-

वरिलप्रमाणे जर जुने LED दिवे फक्त ५ वर्ष निगा व दुरुस्ती केली तर अंदाजपत्रकानुसार ५ वर्षा करिता SOR दरानुसार रु.१,८८,५५,५९८/- खर्च येईल. परंतु अतिरीक्त् वीज बचत होणार नाही व दरमहा खर्च रु. ३,१४,२६०/- येईल.

जुने दिवे बदली करुन नव्याने Smart LED दिवे ५ वर्ष निगा व दुरुस्ती खर्चासह बसविल्यास वीज बचत होईल व निगा दुरुस्ती खर्चहि कमी येईल. त्यामुळे नव्याने Smart LED दिवे बसवुन निगा व दुरुस्तीसह प्रस्ताव करणे चांगले व फायदयाचे राहील. निगा व दुरुस्ती कमी राहील व नागरिकांच्या तक्रारी कमी येतील.

महानगरपालिका हद्दीमध्ये एमएमआरडीए मार्फत रस्ते उड्डाणपुल कामात लावण्यात आलेल्या दिव्यांच्या तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं | एमएमआरडीए मार्फत बसविण्यात आलेल्या दिव्यांची संख्या | एल.ई.डी. लाईट वॅटेज (watts) | एल.ई.डी. लाईट भार (load in kw) | बसविण्यात येणा-या Smart LED दिव्यांची क्षमता (वॅटेज) | Smart LED लाईट भार (load in kw) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ९३ नग | ३५ वॅट | ३.२५५ | ३० वॅट | २.७९ kw |
| २ | ०३ नग | ५० वॅट | ०.१५ | ४० वॅट | ०.१२ kw |
| ३ | ५७ नग | ७० वॅट | ३.९९ | ५० वॅट | २.८५ kw |
| ४ | १०८४ नग | १०० वॅट | १०८.४ | ७२ वॅट | ७८.०४ kw |
| ५ | २०० नग | १४० वॅट | २८ | १०० वॅट | २० kw |
| ६ | ५८ नग | १५० वॅट | ८.७ | ११० वॅट | ६.३८ kw |
| ७ | २०५ नग | १९० वॅट | ३८.४५ | १४० वॅट | २८.७ kw |
| | **एकूण** | **१९१.४५ kw** | | | **१३८.८९ kw** |

Saving In load - ५२.५६ kw
Daily Usage - १२hr. x ३६५ days

| | | |
|---|---|---|
| Annual unit Saving | - | २,३०,२०० Kwh |
| Electric Tarfff | - | ७.६३ Kwh/Unit |
| Annual saving | - | १७,५६,४२३/- |

वरिल प्रमाणे सध्या ३- ५ वर्ष पर्यत जुने असलेले १७०० नग दिवे वार्षिक निगा व दुरुस्ती करणे ऐवजी नव्याने दिवे बसविल्यास ५ वर्ष पर्यत निगा व दुरुस्तीसह SOR दरानुसार खर्च रु.३,६७,५१,१४४/- येईल.

बाजारभावानुसार नव्याने Smart LED दिवे बसविल्यास खर्च रु.३,३३,७६,५३८/- व रु.८७,८२,११७/- अतिरीक्त् वीज बचत (५ वर्षात) होईल. SOR दरानुसार प्रकल्प खर्च ५ वर्ष Installment व्याजासह अदा केल्यास दरमहा परतावा रु.८,१७,५०९/- सहित एकूण खर्च रु.४,९०,५०,५३४/- येईल. बाजार भावानुसार ५ वर्ष (६० हप्ते) Installment व्याजासहीत रक्कम रु.७,४२,४४३/- प्रतिमाह नुसार एकूण खर्च रु.४,४५,४६,५५९/- येईल.

बाजारभावानुसार सदर प्रकल्प मध्ये Capex खर्च ७५% Upfront (समोर)रु.१,१४,९१,९०४/- अदा केल्यास खर्च कमी येईल. त्यामुळे दरमहा २५ % Capex खर्चाचा परतावा (व्याजासह) व निगा दुरुस्तीसह एकूण येणा-या रुपये ३,४६,५८,५२५/- प्रकल्प खर्चाच्या दरमहा परतावा रु.३,८६,११०/- अदा करावा लागेल. SOR दरानुसार capex + opex+GST Installment सहित येणा-या एकूण रु.,४,९०,५०,५३४/- पेक्षा बाजार भावानुसार खर्च रु.३,४६,५८,५२५/- येईल व तो कमी असेल व मनपा फायदयाचा राहिल.

वरिलप्रमाणे प्रस्ताव सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मंजुर करावयाचा झाल्यास सदर कामी अंदाजे रुपये १.५० कोटी तरतुद करावी लागेल. नविन दिवाबत्ती लेखाशिर्ष मध्ये सध्या रु.१.०० कोटी तरतुद असुन त्यामध्ये नविन पोलसहित दिवाबत्तीची रुपये ५० लाखांची कामे प्रस्तावित आहेत. त्यामुळे "**रस्त्यावरील दिव्यांसाठी खांब लावणे**" या लेखाशिर्ष तरतुदीमध्ये रुपये १ कोटी खर्चाचे पुर्नविनियोजन "**विद्युत देयके खर्च**" या लेखाशिर्ष तरतुद रु.१५.७५ कोटी मधुन करणे कामीच्या प्रस्तावास मा.प्रशासक तथा आयुक्त् सो. यांनी ठराव क्रमांक ५९० दिनांक ३०/०९/२०२४ नुसार मान्यता दिलेली आहे. तरी वरिलप्रमाणे Smart LED पथदिवे बसविणे व ५ वर्ष निगा दुरुस्ती करणेकामीच्या रक्क्म रूपये ३,४६,५८,५२५/- प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ च्या (१अ) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार आपणाकडे असल्याने प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

**ठराव क्रमांक** ६९८

**दिनांक :-**१०/१०/२०२४

**विषय :- महानगरपालिकेच्या हद्दीत एम.एम.आर.डी.ए मार्फत रस्ता रुंदीकरण व सिमेंटीकरण करुन पथदिवे व्यवस्था केलेल्या रस्त्यांवरील पथदिवे बदलून Smart LED पथदिवे बसविणे व ५ वर्ष निगा दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.**

एम.एम.आर.डी.ए मार्फत बसविण्यात आलेले १०७२ दिव्यांना बसवुन ३-४ वर्षाचा कालावधी झालेला आहे. तसेच मनपा निधी तसेच शासन निधीतुन बसविलेले २३५ दिवे तसेच सध्या ईईएसएल मार्फत धामणकर नाका उड्डाणपुल, वंजारपट्टी नाका उड्डाणपुल येथिल दिव्यांचा प्रकाश कमी असल्याने व उड्डाणपुलांवर अपघात होत असल्याने चांगल्या प्रकाशाची आवश्यकता आहे. तसेच शहरांतील चौकामध्ये ईईएसएल मार्फत ५ वर्षापुर्वी बसविण्यात आलेल्या हायमास्टचे फिटींग डॅमेज झालेले असुन ईईएसएल मार्फत फक्त दुरुस्ती केली जाते. बदलण्यात येत नाहीत. त्यामुळे एकूण १७०० नग एल.ई.डी. दिव्यांची वार्षिक निगा व दुरुस्ती करता येत नाही. त्याकरिता दिवे बदली करून वार्षिक दुरूस्ती कामी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

वरिलप्रमाणे प्रस्ताव सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मंजुर करावयाचा झाल्यास सदर कामी अंदाजे रुपये १.५० कोटी तरतुद करावी लागेल. नविन दिवाबत्ती लेखाशिर्ष मध्ये सध्या रु.१.०० कोटी तरतुद असुन त्यामध्ये नविन पोलसहित दिवाबत्तीची रुपये ५० लाखांची कामे प्रस्तावित आहेत. त्यामुळे सदर लेखाशिर्ष मध्ये रु.१ कोटी तरतुदीची पुर्नविनियोजन करावे लागेल. तरी चालू आर्थिक वर्षे २०२४-२५ च्या अर्थसंकल्पामध्ये "**रस्त्यावरील दिव्यांसाठी खांब लावणे**" या लेखाशिर्ष तरतुदीमध्ये रुपये १ कोटी खर्चाचे पुर्नविनियोजन "**विद्युत देयके खर्च**" या लेखाशिर्ष तरतुद रु.१५.७५ कोटी मधुन करणे कामीच्या पुर्नविनियोजन चे प्रस्तावास मा.प्रशासक तथा आयुक्त् सो. यांनी ठराव क्रमांक ५९० दिनांक ३०/०९/२०२४ नुसार मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडिल शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्रक्र ७१(भाग-२)नवि-१४, दिनांक ०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (१अ) तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सदर कामी प्र.कार्यकारी अभियंता(विद्युत), शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, अतिरीक्त आयुक्त यांनी शिफारस केली असून वरिलप्रमाणे Smart LED पथदिवे बसविणे व ५ वर्ष निगा दुरुस्ती करणेकामी रक्कम रूपये ३,४६,५८,५२५/- च्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता देत आहे. तसेच सदर कामाची निविदा मागविणेस मंजूरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

प्रस्तावना :-

**विषय :- वॉर्ड क्रं. २२ मधील विविध परिसरात कॉंक्रिट रस्ता तयार करणे.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या **वॉर्ड क्रं. २२ मधील विविध परिसरात कॉंक्रिट रस्ता तयार करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. २९,९८,१७१/-) या कामाची बी-१ प्रकारची ई-निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची निविदा सुचना क्रं. १७/२०२४-२५ (टेंडर क्र. १०५६८८५) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन मागविणेत आली आहे. सदर कामासाठी एकुण दोन ई निविदा प्राप्त झालेल्या असुन, पात्र निविदाकार **मे. बुबेरे अँड असोसिएट्स, भिवंडी.** यांनी दिलेला देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१० टक्के कमी दराने असुन, कामाची रक्कम रु. **२९,९७,८७१/- (GST** सह) येत आहे.

**मे. बुबेरे अँड असोसिएट्स, भिवंडी.** यांची ई निविदा रक्कम **रु. २९,९७,८७१/-** (अक्षरी रु. एकोणतीस लाख सत्यान्नव हजार आठशे एक्काहत्तर रुपये मात्र) (**GST** सह) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामीच्या प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त आधिकारी मुख्य लेखापरिक्षक तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २७/०९/२०२४ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय ठराव मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** ६20 **दिनांक :-** 90 /90 /२०२४

**वॉर्ड क्रं. २२ मधील विविध परिसरात कॉंक्रिट रस्ता तयार करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. **२९,९८,१७१/-**) कामी पात्र निविदाकार **मे. बुबेरे अँड असोसिएट्स, भिवंडी.** यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१० टक्के कमी दराने असुन, कामाची रक्कम रु. **२९,९७,८७१/-** (अक्षरी रु. एकोणतीस लाख सत्यान्नव हजार आठशे एक्काहत्तर रुपये मात्र) (**GST** सह) ची निविदा मंजुरीस प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, वरिल नमुद कामाचे पात्र निविदाकार **मे. बुबेरे अँड असोसिएट्स, भिवंडी.** यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका